सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२६, मुंबई, दि. ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन परिपत्रक क्र. पीपीई ०७२६/ प्र.क्र.५४/ विशा-५, दि. २७/०७/२०२६.

**विषय** :- महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील तरतूदीनुसार आस्थापनांना नव्याने प्रत्यक्ष संगीत सादरीकरण (ऑर्केस्ट्रा) परवाने मंजूर न करण्याबाबत व यापूर्वी मंजूर केलेल्या परवान्यांचे नुतनीकरण न करण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन परिपत्रक क्र. पीपीई ०७२६/ प्र.क्र.५४/ विशा-५, दि. २७/०७/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०७२७१७२८३४१६२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन परिपत्रकानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
Chandrashekhar Govindrao Shinde
Date: 01-08-2026 13:33:48

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.) (अति.कार्य.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
सर्व पोलीस आयुक्त.
सर्व पोलीस अधीक्षक.
कार्यासन अधिकारी, का.क्र.२४.

प्रत,
अपर पोलीस महासंचालक (का.व सु.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक (का.व सु.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु.), महाराष्ट्र राज्य ,मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (गुन्हे).

प्रत :-
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील तरतूदीनुसार आस्थापनांना नव्याने प्रत्यक्ष संगीत सादरीकरण (ऑर्केस्ट्रा) परवाने मंजूर न करण्याबाबत व यापूर्वी मंजूर केलेल्या परवान्यांचे नुतनीकरण न करण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग
**परिपत्रक क्रमांक : पीपीई ०७२६/प्र.क्र.५४/विशा-५**
**मुख्य इमारत, दुसरा मजला, मादाम कामा रोड,**
**हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक: २७ जुलै, २०२६.**

**परिपत्रक**

"महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रुम) यांमधील अश्लील नृत्यांवर बंदी घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २०१६" राज्यात लागू आहे. सदर अधिनियम लागू झाल्यापासून नृत्य सादरीकरणांवर घातलेल्या निर्बंधांमुळे महाराष्ट्रातील नृत्याविष्कार परवानांच्या संख्येत लक्षणियरित्या घट झाली आहे.

तसेच, सध्या "प्रत्यक्ष संगीत सादरीकरण (ऑर्केस्ट्रा)" परवाना हा महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ च्या कलम ३३ नुसार गठित सार्वजनिक मनोरंजन नियमावलीतील तरतुदींनुसार दिला जात आहे. उपरोक्त अधिनियम, २०१६ वरील निर्बंध टाळण्यासाठी तसेच त्यास पळवाट म्हणून प्रत्यक्ष संगीत सादरीकरण (ऑर्केस्ट्रा) परवान्यांचा पर्यायी स्वरूपात वापर केला जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे. सदर प्रवृत्तीस आळा घालण्यासाठी प्रत्यक्ष संगीत सादरीकरण (ऑर्केस्ट्रा) आस्थापना "महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रुम) यांमधील अश्लील नृत्यांवर बंदी घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २०१६" अंतर्गत आणण्यात आल्या आहेत.

त्यानुषंगाने प्रत्यक्ष संगीत सादरीकरण (ऑर्केस्ट्रा) चे परवाने महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ अंतर्गत न देता, "महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रुम) यांमधील अश्लील नृत्यांवर बंदी घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २०१६" अंतर्गत देण्याबाबतची सुधारणा करण्याबाबतच्या प्रस्तावास व त्यानुषंगाने विधिमंडळास विधेयक

सादर करण्यास दिनांक ०२.०७.२०२६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार प्रस्तुत विधेयक सन २०२६ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात विधिमंडळाने संमत केले असून, मा. राज्यपाल महोदयांची संमती मिळाल्यानंतर दिनांक २२.०७.२०२६ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात अधिनियम क्र. ३६ प्रसिद्ध करण्यात आला आहे.

**२.** सबब, यापुढे महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील तरतूदीनुसार नव्याने प्रत्यक्ष संगीत सादरीकरण (ऑर्केस्ट्रा) परवाने मंजूर करण्यात येऊ नयेत तसेच, यापूर्वी मंजूर केलेल्या प्रत्यक्ष संगीत सादरीकरण (ऑर्केस्ट्रा) परवान्यांचे नुतनीकरण करण्यात येऊ नये. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०७२७१७२८३४१६२९ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by MUGDHA NITIN DHURI
Date: 2026.07.27 17:29:42 +05'30'

**( मुग्धा नि. धुरी )**
**सह सचिव, गृह विभाग**

**प्रत-**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री (शहरे/ग्रामीण), गृह, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे वरीष्ठ स्वीय सहायक.
४. अपर मुख्य सचिव (अपील व सुरक्षा), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक.
५. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. सर्व जिल्हादंडाधिकारी.
७. सर्व पोलीस आयुक्त.
८. सर्व पोलीस अधीक्षक.
९. निवडनस्ती (विशा-५)